फेरीवाला साप्ताहिक दि. २४-०८-२०२३

# देगलूर महाविद्यालयतील तीन कुस्तीपटू 'ब' विभागीय विद्यापीठीय कुस्ती स्पर्धेत जनरल चॅम्पियनशिप

नांदेड - स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड व छत्रपती शिवाजी महाविद्यालय, कंधार यांच्या संयुक्त विद्यमाने दि.२५/०८/२०२३ रोजी आयोजित 'ब' विभागीय आंतर महाविद्यालयीन विद्यापीठीय कुस्ती स्पर्धेत देगलूर महाविद्यालयतील तीन कुस्तीपटूंनी ०६ गुण घेऊन जनरल चॅम्पियनशिप चे द्वितीय स्थान पटकावत श्री.मोरे आदित्य ७९ घस या गटामध्ये सुवर्ण पदक प्राप्त केला आहे तसेच श्री.बोडके जरासंध ७० घस व श्री.मोरे अनिकेत ८६ घस फ्रीस्टाईल गटा मध्ये रौप्य पदक प्राप्त करत देगलुर महाविद्यालयाची यशस्वी परंपरा कायम ठेवली आहे.



या खेळाडूंचे प्रशिक्षक डॉ. निरजकुमार उपलंचवार तसेच मार्गदर्शक म्हणून प्रा.वावधाने दिपक व प्रा. हाके सिताराम असून या यशाबदल अडत व्यापारी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष प्रकाश पाटील बेंबरेकर, सचिव शशिकांत चिद्रावार, उपाध्यक्ष नारायणराव मैलागीरे, सहसचिव सुर्यकांत नारलावार, कोषाध्यक्ष विलास तोटावार व कार्यकारिणी मंडळ सदस्य राजकुमार महाजन, डॉ कर्मवीर उग्रतवार, जनार्दन चिद्रावार, गंगाधर जोशी, रवींद्र अप्पा द्याडे. देवेंन्द्र मोतेवार, चंद्रकांत नारलावार. प्राचार्य डॉ. मोहन खताल, ऊपप्राचार्य डॉ. अनिल चिद्रावार, उपप्राचार्य प्रा. ऊतमकुमार कांबळे पर्यवेक्षक प्रा. संग्राम पाटील, कार्यालय अधीक्षक श्री गोविंद जोशी यांच्यासह सर्व प्राध्यापक, कर्मचारी व विद्यार्थ्यां यांनी आभिनंदन केले आहे.

Scanned with OKEN Scanner